**<u>प्रेस नोट</u>** **दिनांक २६/०३/२०१९**

**संशयित आरोपीकडून ०६ वाहनचोरीचे गुन्हे व दोन वर्षापुर्वी लोहमार्ग, पुणे हद्दीत झालेला खुनाचा गुन्हा युनिट-२, गुन्हे शाखेकडून उघड...**

२/-बंडगार्डन पोलीस ठाणे हद्दीत विशेषतः पुणे स्टेशन परिसरात होणाऱ्या वाहनचोरीला आळा घालणेकामी मा. पोलीस निरीक्षक गजानन पवार यांनी दिले सुचनांप्रमाणे युनिट-२ गुन्हे शाखेकडील पो ना यशवंत खंदारे व मोहसीन शेख असे दिनांक १८/०३/२०१९ रोजी पेट्रोलिंग फिरत असताना त्यांना त्यांचे गोपनीय बातीदारामार्फत गोपनीय माहिती मिळाली की, मुलगा नामे नोयल शबान रा. क्वीन्स गार्डन हा पुणे स्टेशन परिसरात वाहनचोरी करणेकरीता टेहळणी करत फिरत आहे वगैरे बातमी मिळताच सहा. पोलीस निरीक्षक श्री लक्ष्मण ढेंगळे यांनी पो ना यशवंत खंदारे, पो ना मोहसीन शेख पो शि राकेश खुणवे यांचेसह पुणे स्टेशन परिसरात गोपनीयरित्या फिरत असताना नमूद इसम हा पुणे रेल्वे एस टी स्टँड समोरील रोडवर दुचाकी वाहनांची संशयितरित्या टेहळणी करत असताना आढळून आला असता, त्याला जागीच ताबेत घेवून युनिट कार्यालयात आणून चौकशी केली असता तो चौकशीत सहकार्य न करता उडवाउडवीचे उत्तरे देवू लागल्याने त्यास बंडगार्डन पोलीस ठाणे गुरनं १२७/२०१९ भादंवि ३७९ मध्ये अटक करून दुसऱ्या दिवशी त्याला मा. न्यायालयात हजर करून त्याची पोलीस कस्टडी रिमांड घेवून तपास केला असता त्याने चोरी केलेल्या ०६ दुचाकी गाड्या किं रु २,४०,०००/- च्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदिवासी प्रशिक्षण संस्थेच्या सिमाभिंतीचे बाजूचे मोकळ्या जागेत झाडाझुडपांमध्ये लपवून ठेवलेल्या एकूण ०६ गाड्या काढून दिल्या आहेत. सदर गाड्या त्याने बंडगार्डन(०२), येरवडा(०२), चतुःश्रृंगी(०१) व खडकी(०१) भागातून चोरल्याचे सांगितलेलने त्यांचेबाबत अभिलेखांची पाहणी केली असता एकूण ०६ दुचाकी चोरीचे गुन्हे उघडकीस आलेले आहेत.

दरम्यान आरोपीकडे पोलीस कस्टडीरिमांडमध्ये आणखी सखोल तपास करीत असताना त्याने कोरेगाव पार्क रेल्वे ओव्हरब्रीज खाली एका इसमाचा खून केला असलेबाबत पो ना खंदारे यांना त्यांचे गोपनीय बातमीदाराने पक्की खबर दिली त्या अनुषंगाने आरोपीकडे कौशल्यपुर्ण व विश्वासात घेवून सपोनि जयवंत जाधव यांनी तपास केला असता त्याने नोव्हेंबर-२०१७ मध्ये त्याचा शिवाजीनगर पाटील इस्टेट भागात राहणारा जोडीदार तसेच रेल्वेत चोऱ्या करणारा इसम नामे सुरज नादर याने रेल्वेत बॅग चोरलेली होती व त्यात मिळालेले पैश्याची वाटणी करताना आरोपीस व्यवस्थित वाटा न दिलेने त्यांचेत त्यावरून कोरेगाव पार्क रेल्वे ओव्हरब्रीज खाली भांडणे झाली, त्यात आरोपी नोयल याने सुरज नादर याला मारहाण करून त्याचे डोके रेल्वे पटरीजवळील सिंमेंटचे कट्टयावर जोरजोराने आपटून त्याला जीवे ठार मारून खून केला असल्याचे कबूल केले. आरोपीने केले कथनाप्रमाणे लोहमार्ग पोलीस ठाणे, पुणे यांचेकडील अभिलेखाची पाहणी केली असता, दि ०३/११/२०१७ रोजी १५.१५ पुर्वी इसम नामे सुरज रवि नादर वय २० वर्ष रा पाटकल प्लॉट नं ०८, पुणे मुंबई रोड, महात्मा गांधी वसाहत, पुणे-मुंबई रोड, शिवाजीनगर, पुणे-५ हा मयत झालेचे अनुषंगाने अकस्मात मयत रजि. नं ३९९/२०१७ सीआरपीसी १७४ प्रमाणे दाखल असल्याने पो ना खंदारे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून लोहमार्ग पोलीस ठाणे, पुणे येथे आरोपी नामे नोयल ऐलन शबान, वय-१९, रा. क्विन्स गार्डन, सर्किट हाऊस जवळील पुलाखालील झोपडपट्टी, पुणे. याचेविरुध्द गुरनं २९१/२०१९ भादंवि सं कलम ३०२ प्रमाणे गुन्हा नोंद केलेला आहे. अश्याप्रकारे दोन वर्षापुर्वी झालेल्या खूनाला वाचा फोडून खूनाचा गुन्हा उघडकीस आणलेला आहे.

सदरची कामगिरी मा. श्री. प्रदीप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, पुणे मा. श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे शाखा, पुणे शहर, मा. श्री. समीर शेख, सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे-१, पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली व सुचनांप्रमाणे पोलीस निरीक्षक श्री गजानन पवार, सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री लक्ष्मण ढेंगळे, जयवंत जाधव सपोफौ श्री संजय दळवी, अनिल ऊसुलकर, शेखर कोळी पो हवा अजय खराडे, विनायक जाधव पो ना यशवंत खंदारे, मोहसीन शेख व पो शि राकेश खुणवे, विवेक जाधव, चंद्रकांत महाजन यांनी कौशल्यपुर्ण तपास करून गुन्हे उघडकीस आणलेले आहेत.

पोलीस निरीक्षक
गुन्हे शाखा, युनिट-२,
पुणे शहर.